




# दैनिक मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








• बीड(महाराष्ट्र) • वर्ष ५ वे • अंक १६४ • शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक

## ३४ जिल्हा परिषदांमध्ये अध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर




**मुंबई । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठी बातमी समोर आली आहे. ३४ जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर झालं आहे. पुणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव जिल्हा परिषदांमध्ये सर्वसाधारण गटासाठी अध्यक्षपद आरक्षित असणार आहे. कोणत्या जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्षपद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव आहे ते सविस्तर जाणून घेऊयात.

रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारण गटासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. तर ठाणे, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या जिल्हा परिषदांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. सोलापूर, हिंगोली, नागपूर, भंडारा या ठिकाणी पुरुष मागस प्रवर्गासाठी आरक्षण तर रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, नांदेड या ठिकाणी महिला मागस प्रवर्गासाठी आरक्षण असणार आहे.

राज्यात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पार पडणार आहे. यासाठी राजकीय पक्षांसह आता निवडणूक आयोगानेही तयारीला सुरुवात केल्याचे दिसत आहे. आयोगाकडून जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे आता राजकीय पक्षांना आपापली रणनीती तयार करण्यास मदत होणार आहे. आता आगामी काळात लवकरच जिल्हा परिषद निवडणुकांचे वेळापत्रकही जाहीर होण्याची शक्यता आहे.

### • ३४ जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपदाचे आरक्षण

ठाणे -सर्वसाधारण (महिला)
पालघर - अनुसुसूचित जमाती
रायगड- सर्वसाधारण
रत्नागिरी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
सिंधुदुर्ग - सर्वसाधारण
नाशिक -सर्वसाधारण
धुळे -नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
नंदूरबार-अनुसूचित जमाती
जळगांव - सर्वसाधारण

▶ उर्वरित पान २ वर

## ‘मिशन वात्सल्य योजने’चा सर्व विधवा व एकल महिलांना मिळणार लाभ: महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**



कोविड १९ या संसर्गजन्य आजारामुळे दोन्ही पालकांचे निधन होऊन अनाथ झालेल्या बालकांना तसेच विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता करून देण्याच्या उद्देशाने शासनाने ‘मिशन वात्सल्य योजना’ यशस्वीपणे राबविली. या योजनेची व्याप्ती वाढवून राज्यातील सर्व विधवा, एकल, परित्यक्त्या महिलांना ’शासन आपल्या दारी’ या संकल्पनेनुसार या योजनेचा लाभ देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

कोविड काळात सुरू केलेल्या ‘मिशन वात्सल्य योजने’ची अंमलबजावणी करण्यासाठी तालुका स्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. अनाथ मुले, विधवा व एकल महिलांना त्यांना लागू होणाऱ्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला. या योजनेअंतर्गत दोन्ही पालकांचे निधन झालेल्या अनाथ मुलांना शासकीय मदत, मृत्यू दाखला, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, विधवा पेन्शन, रेशनकार्ड, निवारा व इतर सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ, अत्यावश्यक कागदपत्रे शिबिरांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहितीही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी दिली. आता याच योजनेत सर्व विधवा महिलांचा समोवश करण्यात आला असून, जिल्हास्तरावर विविध शिबीरे व मेळावे आयोजित करून समितीच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. राज्यातील सर्व एकल महिलांना यामुळे दिलासा मिळणार आहे.

## मराठा आरक्षणासाठी आणखी एका युवक शेतकऱ्याची आत्महत्या; बीड जिल्ह्यातील आहेर धानोरा येथे दुर्दैवी घटना

**बीड । प्रतिनिधी**



मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आणखी एक बळी पडला आहे. बीड तालुक्यातील आहेर धानोरा येथील एका ४० वर्षीय युवक शेतकऱ्याने मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने आणि आर्थिक अडचणींना कंटाळून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष वळे यांच्याकडे कुणबी असल्याचा कोणताही जुना पुरावा किंवा नोंद नव्हती, ज्यामुळे त्यांना मराठा आरक्षणाचा लाभ घेणे शक्य झाले नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यांना दोन मुले असून, त्यांच्या शिक्षणाचा खर्च आणि शेतीत येणारा खर्च यांचा ताळमेळ बसत नव्हता. या आर्थिक विवंचनेतून आणि मराठा आरक्षणाच्या अनिश्चिततेमुळे आलेल्या नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. संतोष वळे यांनी २ सप्टेंबर रोजी कीटकनाशक औषध प्राशन करून जीवन संपवण्याचा प्रयत्न केला

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : भाजपा नेते श्री. शरद झोडगे यांच्या निवास्थानी ह. भ. प.गुरुवर्य .शांती ब्रम्ह श्री. नवनाथ बाबा आले असता त्यांचे आशीर्वाद घेतांना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे,या दैनिक मराठवाडा पत्र चे आवालोकन करतांना बाबा छायाचित्रात दिसत आहेत.*

## सी.पी. राधाकृष्णन यांचा भारताचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून शपथविधी संपन्न



**नवी दिल्ली**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून सी.पी. राधाकृष्णन यांना आज राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडपम येथे पदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली. या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा

▶▶ उर्वरित पान २

## हैदराबाद गॅझेटचा जीआर चुकीचा असेल तर शरद पवार यांचा १९९४ चा शासन निर्णयही रद्द होणार, कोणी केला दावा?

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्य सरकारनं राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जीआर काढला आहे, मात्र या जीआरनंतर आता ओबीसी समाज चांगलाच आक्रमक झाला आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण नको, स्वतंत्र आरक्षण द्या अशी त्यांची भूमिका आहे. या जीआरनंतर आता पुन्हा एकदा मराठा समाज आणि ओबीसी समाज आमने-सामने आल्याचं चित्र आहे. दरम्यान सरकारने काढलेल्या हैदराबाद गॅझेटच्या जीआरवर बोलताना मराठा समन्वयक योगेश केदार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मनोज जरांगे पाटील यांनी हैदराबाद गॅझेटचा शासन निर्णय घेतला आणि

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड साठी कचरा / घंटा गाड्या.. बीड शहर बचाव मंचाचे मोठे यश

- बीड शहराला रस्ते व नाल्या कधी मिळणार..
- चार घंटा गाड्या देऊन बीडचा विकास होणार आहे का ?
- अमृत अटल जल योजनेचे काय ..चौकशी होणार का ?




**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंचाच्या प्रदीर्घ लढाईनंतर येणाऱ्या निवडणुकीत होणारी हार दिसू लागल्यामुळे नाईलाजाने का होईना बीड नगर परिषदेला कचरा गोळा करण्यासाठी घंटागाड्या देण्यात येणार आहेत. जसे मोगलांच्या सैन्याला कुठेही, नदीच्या पाण्यातही धनाजी- संताजी दिसायचे तसेच सत्ताधारी पक्षांना व नेत्यांना होणाऱ्या नगरपालिका निवडणुकीमध्ये होणारी हार स्पष्ट दिसू लागलेली आहे. नाईलाज म्हणून आज बीडला घंटा गाड्या देण्यात येत आहेत. बीडची जनता व बीडच्या जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंच घंटा गाड्या नियमित चालू राहू द्या व घंटागाड्यांची आपल्याला गरज आहे अशी मागणी सातत्याने गेल्या दोन वर्षापासून करत आहे. बीड शहरामध्ये जागोजागी गल्लोगल्ली कचऱ्याचे मोठ-मोठे ढिगारे

▶▶ उर्वरित पान २ वर

## नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान : लाखो नागरिकांना मिळणार नवदृष्टीचा लाभ



**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर पासून ‘नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान’ महाराष्ट्रभर राबविले जाणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात दहा लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहेत. या विशेष मोहिमेतून मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चष्मेवाटप केले जाणार असून काचबिंदूसह इतर नेत्रविकारांवरील निदान, सल्ला आणि उपचार देखील मोफत केले जाणार आहेत. जिल्हा व तालुका स्तरावर शिबिरे राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ होईल. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व

▶▶ उर्वरित पान २ वर

## न्यायालयाचा ग्राहकाला दिलासा: विमा कंपनीला द्यावा लागणार नुकसान भरपाई

**बीड । प्रतिनिधी**

पाठीच्या दुखण्यावर उपचार घेण्यासाठी पुण्यातील संचेती रुग्णालयात दाखल झालेल्या तक्रारदाराला विमा पॉलिसी असूनही कॅशलेस सुविधा नाकारल्याप्रकरणी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने विमा कंपनीवर कारवाई करत, तक्रारदारास दवाखान्याचा आणि मेडिकल खर्च मिळून ८९,७५०/-रुपये आणि मानसिक त्रास व तक्रारीसाठी २०,०००/- नुकसानभरपाई असे एकूण १,०९,७५० ची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. राजकुमार निवृत्ती गंगणे (रा. अंबाजोगाई) असे तक्रारदाराचे नाव असून, त्यांना पाठीचा त्रास होऊ लागल्याने त्यांना पुण्यातील नामांकित संचेती हॉस्पिटल येथे दाखल करण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर






## ओबीसी आरक्षण : आत्महत्या केलेल्या भरत कराडच्या कुटुंबीयांना 25 लाखांची आर्थिक मदत व एका सदस्यास शासकीय नोकरी द्यावी

## धनंजय मुंडे करणार राज्य शासनाकडे मागणी

- लातूर जिल्ह्यातील मयत भरत कराडच्या कुटुंबीयांचे मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन
- धनंजय मुंडे यांच्या कडून कराड कुटुंबास एक लाखांची तातडीची आर्थिक मदत
- जीव गमावल्यास आरक्षण कुणासाठी ? धनंजय मुंडेंचे भावनिक आवाहन



**लातूर । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण संपुष्टात आल्याच्या नैराश्यातून वांगदरी ता. रेणापूर येथील पस्तीस वर्षीय तरुण भरत महादेव गायकवाड यांनी नदीत उडी घेऊन आत्महत्या केली होती. याच पार्शवभूमीवर राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ तसेच ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी वांगदरी येथे जाऊन मयत कराड यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. मयत भरत कराड यांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून २५ लाखांची आर्थिक मदत करण्यात यावी तसेच त्यांच्या कुटुंबातील एका सदस्यास शासकीय नोकरी देण्यात यावी, याबाबत आपण पत्राद्वारे मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. आरक्षणाच्या लढाईत सर्वजण एक जुटीने लढा देऊ, असे म्हणताना मंत्री छगन भुजबळ यांनी देखील दुःख व्यक्त करत भरत कराड आमच्या आंदोलनात सहभागी असायचा असे म्हणत आरक्षणाच्या कायदेशीर बाबींवर मत व्यक्त केले. यावेळी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी ते अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने कराड

▶▶ उर्वरित पान २ वर



## थेट कर्ज योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या ) बीड जिल्हा कार्यालयास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता थेट कर्ज योजना राबविली जाणार आहे. योजनेचे नाव थेट कर्ज योजना, प्रकल्प मर्यादा १००,०००, भौतीक उद्दीष्टे १००, आर्थिक उद्दीष्टे १००.०० थेट कर्ज योजनेचे कर्ज प्रस्ताव बीड जिल्हायातील मातंग समाजातील ईच्छुक अर्जदारांनी सादर करावेत. अर्जदाराचे वय १८ वर्ष पुर्ण असावे व ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. शहरी व ग्रामिण अर्जदाराच्या कुटुबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख पेक्षा जास्त नसावे तसेच अर्जदाराने या पुर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा, नियमाप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन सदर योजनेत साधरणपणे सामाविष्ट लघु व्यवसायासाठी कर्ज प्रस्ताव दोन प्रतीत खालील ठिकाणी स्वत: अर्जदाराने मुळ कागदपत्रासह उपस्थीत राहून दाखल करावे, त्रयस्त/मध्यस्थामार्फत कर्ज प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत.

कर्ज प्रकरणासोबत जोडावयाची कागदपत्रे: जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्डची झेरॉक्स प्रत, आधार कार्डची झेरॉक्स प्रत, पॅन कार्डची झेरॉक्स प्रत, दोन पासपोर्ट फोटो, व्यवसायाचे दरपत्रक (कोटेशन), व्यवसाय ज्या टिकाणी करावयाचा आहे त्या ठिकाणची भाडे पावती, करारपत्रक किंवा मालकी हक्काचा पुरावा, (नमुना नं ०८, लाईट बिल व टॅक्स पावती ७/१२ व ८अ) ९) ग्रामपंचायत/नगरपालीका/महा नगरपालीका यांचे प्रमाणपत्र किंवा शॉप क्ट परवाना ,व्यवसायासंबधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला, शैक्षणिक दाखला, अनुदान किंवा कर्जाचा लाभ न घेतलेले प्रमाणपत्र, अर्जदाराचे सिबील क्रेडीट स्कोअर ५०० असावा, अर्जदाराने आधारकार्ड जोडलेल्या बॅक खात्याचा तपशिल सादर करावा, प्रकरनासोबतची सर्व कागदपत्रे स्वता:च्या स्वाक्षरीने साक्षांकीत करावी. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.

या योजनेचे कर्ज प्रस्ताव महामंडळाच्या विहित नमुन्यातील झेरॉक्स हस्तालिखित, टंकलिखित केलेला अर्ज दि.१० सटेंबर २०२५ ते दि.१० ऑक्टोबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस वगळून सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत महामंडळाचे जिल्हा कार्यालय. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या ), जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला जिल्हाधिकारी कार्यालया समोर बीड या ठिकाणी स्विकारले जातील.

थेट कर्ज योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे- ✻ अर्जदार हा मतंग समाजाच्या बारा पोट जातीतील असावा. ✻अर्जदाराचे वय १८ वर्ष पुर्ण असावे व ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. ✻ शहरी व ग्रामिण अर्जदाराच्या कुटुबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख पेक्षा जास्त नसावे. ✻अर्जदाराने या पुर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.

कर्ज प्रकरणासोबत जोडावयाची कागदपत्रे: १) जातीचा दाखला २) उत्पन्नाचा दाखला ३) रेशनकार्डची झेरॉक्स प्रत ४) आधार कार्डची झेरॉक्स प्रत ५) पॅन कार्डची झेरॉक्स प्रत ६) तीन पासपोर्ट फोटो ७) व्यवसायाचे दरपत्रक (कोटेशन) ८) व्यवसाय ज्या ढिकाणी करावयाचा आहे त्या ठिकानची भाडे पावती, करारपत्रक किंवा मालकी हक्काचा पुरावा, (नमुना नं ०८, लाईट बिल व टॅक्स पावती) ९) ग्रामपंचायत/नगरपालीका यांचे ना हरकत प्रमाणपत्र किंवा शॉप क्ट,उद्योग आधार परवाना १०) व्यवसायासंबधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला ११) शैक्षणिक दाखला १२) अनुदान किंवा कर्जाचा लाभ न घेतलेले प्रमाणपत्र १३) अर्जदाराचे सिबील क्रेडीट स्कोअर ५०० असावा १४) अर्जदाराने आधारकार्ड जोडलेल्या बॅक खात्याचा तपशिल सादर करावा १५) प्रकरणा सोबतची सर्व कागदपत्रे स्वता:च्या स्वाक्षरीने स्वय साक्षांकनासाठी घोषणापत्रासह साक्षांकीत करावी. १६) एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. इत्यादी

## मित्रप्रेम: आयुष्यातील ब्लॉकेज रिलीज करणारी नाती



रात्री चे २ वाजलेत आणि मी फोन हातात घेतला आहे.कॉल पण लावला...
हॅलो, सुभाष बोल ना मित्रा सगळं ठीक आहे ना ?
मी- सर्व उत्तम आहे रे सहज कॉल केला...
मित्र-मग,इतक्या रात्री ! ? बरच काही बोलतो
मी- का रे मी कॉल नाही करायचा का,इतकी छोटी मैत्री आपली
तिकडून, अरे हक्काने कर तुझा मित्र आहे मी,आणि तू माझ्या हृदयात कायम असतोस बोल काय चाललंय,कोणतं वाचतोय आता पुस्तक...
मी- छान चाललंय वाचत आहे सध्या भटक्या विमुक्तांचे स्वातंत्र्य...
वाच वाच छान पुस्तक आहे,तुझं मस्तक शांत ठेवेल...(जोरात हसतो त्यामुळे त्याची सौभाग्यवती जागी होते)
ती- सुभाष सर आहेत ना बोला निवांत मी ब्लॅक टी घेऊन येते...
इतक्या सहज मैत्रीतला संवाद व वेळकाळाचे बंधन नाही...अशी मैत्री असावी.जिथे अहो, जाओ नाही तर अरे तुरे, तू मी असावं वेळप्रसंगी कधीही रात्री बेरात्री बोलता यावं...माझ्याकडे आहेत असे स्पेशल निड्स वाले मित्र.अगदी परराज्यात /विदेशात सुद्धा आहेत.

एकदा असच कॉल आला मी स्किरीन पाहिली तर माझा तेलंगाणा चा लहानपणी चा मित्र रामचंद्र बेगाली सध्या बेंगलोर येथे भारतीय अँटी बॉम्ब स्कॉड मध्ये वैज्ञानिक आहे.वेळ पहाटे ३ ची
रॅम-हॅलो,सुभास सो गये था क्या...
मी-हा रॅम बोल नहीं भाई बात करो
रॅम-कुछ नहीं, अम्मा की और निकला है,फ्लाईट लेट है दो घंटे तो बोला तेरे से बात करना
मी -यार खुशी हुई चलो सुरू करते है...
मग लहानपणीचे किस्से ज्यात आमच्या कृष्ण खोड्या,चप्पल विसंगती,पैशाच झाड,अहमद ची दहशत बरच काही धूसर झालेलं सगळं धूळ उडून स्वच्छ व्हावे असे एकदम ताजे झाले.५ वाजता त्याच्या विमानाची घोषणा झाली आणि फोन ठेवावा लागला.

असे मित्र आपल्या आयुष्यात असे हक्काचे लाईफ ब्लॉक रिलीज करणारे मित्र असावेत.

एक किस्सा फार गमतीदार घडला होता,मी चौक ला सुरुवातीला राहत असताना(अजूनही चौकलाच राहतो) एक सिम खरेदी केला व वापरात ठेवला गणपती सुट्टीत गावी जाणे झाले,त्यावेळी एक फोन मामा ला घेऊन दिला त्यात तो सिम टाकला.सुट्टी संपली मी परत आलो.दोन दिवसांनी मामा ला एक कॉल आला आणि एक मुलगी जोरजोरात रडत तक्रार करत होती माझे नाव सतत घेऊन.वेळ पण रात्री ११.४५ ची.मामा घाबरले, लागोलाग मला कॉल केला मी नंबर मागितला आणि त्यावर कॉल केला,तर काही दिवसांपूर्वी माझ्या ओळखीने एक मुलगी पनवेल ला नोकरी ला लागली होती,दवाखान्यात.गणपती कार्यक्रम आटोपून ती पनवेल साठी पुण्यावरून निघाली तिला लोणावळ्यात काही इसमांनी त्रास दिला व ती घाबरली होती.मी तातडीने तिला कॉल केला व मदत करून पुढे सुखरूप पनवेल पोहोचण्याची सोय केली.म्हणजे कोणालातरी आपण सुरक्षित वाटतो.हे पण फार मौल्यवान आहे.या घटनेनंतर मला सलग पंधरा दिवस गावाकडून कॉल यायचे,त्यांना असे वाटायचे की माझंच काहीतरी बरे वाईट झाले...पण काही असो आपण किमान एक तरी ब्लॉक रिलीजर ठेवूया.

-सुभाषदादा राठोड

◆ पान १ वरून पुढे...

### ●३४ जिल्हा परिषदांमधील....

अहिल्यानगर अनुसुचित जमाती (महिला)
पुणे -सर्वसाधारण
सातारा- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
सांगली - सर्वसाधारण (महिला)
सोलापूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग
कोल्हापूर- सर्वसाधारण (महिला)
छत्रपती संभाजीनगर -सर्वसाधारण
जालना - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
बीड - अनुसूचित जाती (महिला)
हिंगोली -अनुसूचित जाती
नांदेड - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
धाराशिव - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
लातूर - सर्वसाधारण (महिला)
अमरावती - सर्वसाधारण (महिला)
अकोला - अनुसूचित जमाती (महिला)
परभणी - अनुसूचित जाती
वाशिम अनुसूचित जमाती (महिला)
बुलढाणा -सर्वसाधारण
यवतमाळ सर्वसाधारण
नागपूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग
वर्धा- अनुसूचित जाती
भंडारा - नागरिकांचा मागास प्रवर्ग
गोंदिया - सर्वसाधारण (महिला)
चंद्रपूर - अनुसूचित जाती (महिला)
गडचिरोली -सर्वसाधारण (महिला)

### मराठा आरक्षणासाठी...

असता त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान आज पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. गावातील दुसरी घटना- आहेर धानोरा गावातील ही मराठा आरक्षणासाठी झालेली दुसरी आत्महत्या आहे. याच वर्षी यापूर्वीही याच मागणीसाठी एका तरुणाने आत्महत्या केली होती, त्यामुळे मराठा समाजातील आरक्षणाचा मुद्दा किती गंभीर झाला आहे, हे पुन्हा एकदा समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, मराठा आरक्षण आंदोलनाची मागणी पुन्हा एकदा तीव्र होण्याची शक्यता आहे. या दुर्दैवी घटनेमुळे समाजातील नैराश्य आणि आर्थिक संघर्ष किती वाढला आहे, यावर पुन्हा एकदा गंभीरपणे विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

◆ पान १ वरून पुढे...

### सी.पी. राधाकृष्णन...

अध्यक्ष ओम बिर्ला, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जयदीप धनखड अनेक केंद्रीय मंत्री,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,विधानसभाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपराष्ट्रपती म्हणून श्री राधाकृष्णन हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

### हैदराबाद गॅझेटचा...

आमरण उपोषण त्यांनी सोडलं. पण जेव्हा मराठा आरक्षणची उपसमिती आझाद मैदानावर जरांगे पाटील यांचं उपोषण सोडवण्यासाठी आली होती, तेव्हा हाच शासन निर्णय मनोज जरांगे पाटील यांनी मला बघायला दिला होता आणि यात काही त्रुटी आहे का? हे सांगा असं सुद्धा त्यांनी मला म्हटलं. तेव्हा मी आझाद मैदानावर त्यांना सांगितलं की या शासन निर्णयामध्ये वेगळं काहीच नाहीये. गेल्या वर्षी मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी जी अधिसूचना काढली होती, त्यात आणि या शासन निर्णयामध्ये वेगळं काहीच नाही. असं मी जरांगे पाटील यांना सांगितलं पण त्यांनी हे ऐकून सुद्धा उपोषण सोडलं, त्यांनी असं का केलं हे मला माहीत नाही, असं केदार यांनी म्हटलं आहे. दरम्यान जरांगे पाटील यांनी अजून एक दिवस आपलं उपोषण जर सुरू ठेवल असतं, तर संपूर्ण मराठा समाजाला जे हवं होतं, ते आरक्षण मिळालं असतं. आणि सरकारने ते आपल्याला दिल असतं, कारण हे आंदोलन मिटवण्याकरिता कोर्टाचा सरकारवर दबाव होता, असा दावाही यावेळी केदार यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, या हैदराबाद गॅझेटच्या शासन निर्णयाच्या संदर्भात जर आत्ता कोणी कोर्टात जात असेल तर तो त्यांचा संविधानिक अधिकार आहे, पण हा शासन निर्णय कोर्टात टिकणार आहे तो टिकवण्याची जबाबदारी या सरकारची असणार आहे. पण मराठ्यांच्या हाताला काही लागल नाही, हे मी आताही सांगत आहे, असंही केदार यांनी म्हटलं आहे. यावेळी बोलताना केदार यांनी मोठा दावा केला आहे. जर हा शासन निर्णय चुकीचा असेल तर तर २३ मार्च १९९४ चा शरद पवार यांनी जो शासन निर्णय काढला आहे तो देखील चुकीचा आहे.

### नमो नेत्र...

संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येतील. उपक्रमातील संस्थांचा व्यापक सहभाग- या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्र रुग्णालये व विविध सामाजिक संस्था या उपक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी होणार आहे.

◆ पान १ वरून पुढे...

### बीड साठी...

लागले आहेत. नाल्या तुंबलेल्या आहेत सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था नाही. बीड शहर हे उकांड्यांचे शहर बनलेले आहे. बीडच्या ७० टक्के भागांमध्ये गेल्या २० वर्षापासून रस्ते नाल्याच झालेल्या नाहीत. उद्या होणाऱ्या दौऱ्यामध्ये मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या दोघांनीही बीड शहराचा पाहणी दौरा पोलीस संरक्षण विरहित करावा. तुम्हाला बीड शहराची खरी दुर्दशा व बीड शहरातील जनतेचा आक्रोश कळल्याशिवाय राहणार नाही. गेल्या ४० वर्षापासून बीडच्या जनतेने मते घेऊन या महाराष्ट्राला व देशाला फार मोठ-मोठे नेते दिले आहेत. एकेकाळचे अटलजीच्या सरकारचे सर्वेसर्वा आदरणीय प्रमोदजी महाजन, आ.गोपीनाथरावजी मुंडे साहेब, आदरणीय पंकजाताई मुंडे, आ.प्रीतम ताई मुंडे, तथाकथित डीएम वगैरे, आदरणीय केशरकाकू क्षीरसागर, मा.जयदत्तजी क्षीरसागर व त्यांच्या पुढच्या पिढीतील पिलावळ ही सर्व देशाच्या व राज्याच्या राजकारणातील मोठ-मोठी नावे ऐकल्यावर या सर्व नेत्यांच्या नेतृत्वामध्ये बीड शहराचा व बीड जिल्ह्याचा किती विकास व्हायला पाहिजे होता आणि प्रत्यक्षात किती विकास झालेला आहे हा जनतेने नक्कीच अतिशय गांभीर्याने विचार करायला पाहिजे आणि खरोखर विचार करण्याची आज वेळ आलेली आहे. खरोखरच सत्तेचा उपयोग करून या सर्व नेत्यांना बीडचा व बीड जिल्ह्याचा खूप मोठा विकास करता आला असता.बेरोजगारी नाहीशी करता आली असती. या सर्व नेत्यांकडे इच्छाशक्ती व व्हिजनचा अभाव आहे (बहुदा स्वतःच्या स्वार्थापुढे काही दिसतच नाही). आपल्या खूप नंतर अलीकडच्या काळातही काही निर्माण झालेले जिल्हे आपल्यापेक्षा जास्त विकसनशील आहेत व आपल्यापेक्षा अनेक पटीने प्रगतीपथावर आहेत. एवढ्या सगळ्या मोठ-मोठ्या नेत्यांच्या राजकीय दबदब्यानंतरही आपले बीड मागासलेले कसे राहिले हे एक मोठे रहस्य आहे. आपल्या जिल्ह्याचा आणि बीड शहराचा विकास व्हावा अशी या सगळ्या राजकीय नेत्यांची इच्छाशक्ती नव्हती का.. का या सर्व नेत्यांनी बीड जिल्ह्याचा विकास केला नाही... का बीड जिल्ह्याच्या आणि बीड शहराच्या विकासाचा अनुशेष एवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला... पाणी मुरतय कुठं..??या सर्व बाबींचा बीडचा जनतेने अतिशय गांभीर्याने विचार करायला हवा. या सर्व नेत्यांनी जनतेच्या जीवावर स्वतःच्या पुढच्या पिढ्यांसाठी मोठ-मोठी संस्थाची,कारखान्यांची व अनेक प्रकारच्या उद्योग व्यवसायांची साम्राज्य निर्माण केली आहेत. पण तुमच्या आमच्या पुढच्या पिढीचे काय..?? त्यांचे कसे होणार त्यांना वाली कोण..? आज फक्त चार कचऱ्याच्या घंटागाड्या देऊन सगळा विकास साध्य होणार आहे का... विकासाचा अनुशेष भरून निघणार आहे का... आपल्या बीडच्या जनतेचा मागासलेपणा दूर होणार आहे का..? नाना अनंत प्रश्न आणखीनही तसेच ज्वलंत आहेत... या सर्वांची उत्तरं काय.. जनतेने अतिशय गांभीर्याने विचार करायला हवा.. चार घंटा गाड्या दिल्याने हे सर्व प्रश्न सुटणार आहेत का...?? हा बीड शहर बचाव मंचाचा सर्व नेत्या पुढाऱ्यांना प्रश्न आहे व आव्हान आहे की याचे उत्तर द्या.

### न्यायालयाचा ग्राहकाला...

आले. विविध चाचण्या व एम.आर.आय. नंतर डॉक्टरांनी उपचारांची शिफारस केली. तक्रारदारांकडे द ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी ची वैद्यकीय विमा पॉलिसी असतानाही रुग्णालयातर्फे कॅशलेस सुविधा मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करूनही विमा कंपनीने ती सेवा नाकारली. यामुळे तक्रारदाराला संपूर्ण उपचाराचा खर्च स्वतःच्या खिशातून भरावा लागला. यानंतर त्यांनी ॲड. बालाप्रसाद सारडा यांच्यामार्फत बीड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्राराच्या सुनावणीदरम्यान ॲड. सारडा यांनी तक्रारदाराच्या बाजूने ठोस युक्तिवाद सादर करत सर्व संबंधित कागदपत्रे व पुरावे आयोगासमोर ठेवले. आयोगानेही याची गंभीर दखल घेत द ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी यांच्यावर कारवाई करत पुढीलप्रमाणे आदेश दिले: दवाखान्याचा आणि मेडिकल खर्च मिळून ८९,७५०/- त्वरित अदा करावेत. मानसिक त्रास व तक्रारीसाठी २०,०००/- नुकसानभरपाई देण्यात यावी. तक्रार दाखल झालेल्या दिवसापासून वरील रकमेवर ९% दराने व्याज द्यावे. ही कारवाई ग्राहक आयोगाचे अध्यक्ष हरीश गो. अडके, सदस्या सौ. सतिका ग. शिरदे, आणि सौ. संगिनी राहुल पोळ यांच्या आयोगासमोर झाली.

### ओबीसी आरक्षण ...

कुटुंबाला तातडीची मदत म्हणून एक लाख रुपये आर्थिक मदत सुपूर्द केली. यावेळी श्री भुजबळ यांनी देखील आर्थिक मदत केली असून, आ. रमेश कराड यांनी भरत कराड यांच्या मुलींच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली असल्याचे जाहीर केले. दरम्यान राज्य सरकार आरक्षण आणि कोणत्याही समाजावर अन्याय होऊ नये याबाबत सजग असून, कुठल्याही समाजाचे आरक्षण धोक्यात आल्यास प्रसंगी संविधानाच्या चौकटीत राहून लढा लढला जाईल, त्यामुळे कुणीही टोकाचे पाऊल उचलू नये, तरुणांनी आत्महत्या केल्या तर आरक्षण कुणासाठी मागायचे, असा भावनिक प्रश्न धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला आहे. याप्रसंगी आ. रमेश कराड, समता परिषदेचे ड. सुभाष राऊत, राजकिशोर मोदी, बालासाहेब शेप, बाळासाहेब सोनवणे यांसह आदी उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

### खा.सोनवणेंची....

यानंतर खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते लिंबूपाणी देऊन उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी उपोषणकर्ते ए.एल.उनवणे व उपोषणकर्ते उपस्थित होते. यानंतर अखिल भारतीय बहूजन शेतकरी गायरान धारक न्याय हक्क संघर्ष मोर्चाच्या वतीने गायरान सातबारा मिळण्यासाठी करचुंडी येथील जयसिंग वीर यांच्या सुरू असलेल्या उपोषणास्थळी भेट देऊन वीर यांच्याशी संवाद साधला. वीर यांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत सविस्तर माहिती दिल्यानंतर मी तातडीने जिल्हाधिकारी यांच्याशी बोलतो, आणि आपल्या मागण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सुचना देतो असे म्हणत उपोषणकर्त्यांना दिलासा दिला. यानंतर मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटिअर नूसार अनुसुचित जमाती प्रवर्ग आरक्षणाचा दर्जा देण्याबाबत सतिष पवार, रा. कोळगाव तांडा यांच्या उपोषणाला भेट दिला. यावेळी त्यांनी सतिष पवार यांची भेट घेत संवाद साधला. शिवाय तुमच्या मागणीला माझा पाठिंबा आहे. पाठींब्याचे पत्रही मी आपल्याला देत आहे. या प्रश्नासाठी मी आपल्यासोबत आहे. तुमची नोंद असल्यास तुम्हाला एसटीचे आरक्षण मिळायलाच हवे, असेही खा.सोनवणे यांनी स्पष्ट केले. यावेळी बंजारा समाजातील तरूणांनी पाठिंबा दिल्याबद्दल खा.सोनवणे यांचे टाळ्यांचा कडकडाट करत स्वागत केले.

### घरफोडी प्रकरणातील...

नंदलाल गुरखुदे असल्याचे उघड झाले. त्याचा शोध घेतला असता, आरोपी हा चोरीनंतर बीड शहरातून गायब झाला होता. त्याच्यावर याआधीही जबरी चोरी, मारामारी असे विविध गुन्हे दाखल असून तो सतत गुन्हेगारी करणारा व बीड पोलिसांच्या अनेक गुन्ह्यात वॉन्टेड आरोपी होता. दरम्यान, गुप्त माहितीच्या तसेच आधारे पोलिसांना कळाले की आरोपी शिवा हा नांदेड येथील गणेशोत्सव कार्यक्रमांना नियमित जात आहे. ही माहिती मिळताच बीड पोलिसांच्या पथकाने नांदेड येथे गुप्तपणे सापळा लावला त्यावेळी आरोपी हा गणेशोत्सव कार्यक्रमात आला असताना पोलिसांनी योग्य वेळी दबा धरून आरोपीला अटक करण्यात यश मिळवले. अटक केल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत, अपर पोलिस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, पीएसआय श्री. महेश जाधव, पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर व राम पवार यांनी केली.

### वाढदिवसानिमित्त रुई....

प्रकारामुळे कायद्याचा धाक शिल्लक राहिला आहे का?असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. दहा महिन्यापूर्वी सरपंच देशमुख यांच्या हत्येनंतर जिल्हा प्रशासनाने अलर्ट मोडवर येऊन बीड जिल्ह्यातील शेकडो पिस्तूल परवाने रद्द केले होते. अशा कठोर निर्णयानंतरही जर एअरगन अथवा इतर शस्त्रास्त्रांचा वापर करून वाढदिवसा दिवशी, सर्वांसमोर गावात गोळीबार होत असेल तर कायद्याचा धाक कोणालाही राहिला नाही, हे दिसून येत आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती कळत आहे.

### पाटोद्यात रस्त्यांची...

धरत आहे. विकासाच्या नावाखाली केवळ भ्रष्टाचार आणि निधीचा अपव्यय होत असल्याने सर्वसामान्य जनता फसली असल्याची भावना निर्माण झाली आहे.आता तरी नागरिकांनी जागे होऊन दर्जाहीन रस्त्यांची चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा पाटोद्यातील नागरिकांना दरवर्षी अशाच खड्ड्यांमध्ये आपले भविष्य शोधावे लागणार आहे.

### माहिती अधिकार...

फेडरेशनच्या सोलापूर टीमने जोरदार तयारी सुरू केली आहे. शासन व प्रशासन भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शक असावे व त्यात नागरीकांचा सहभाग असावा या उदात्त हेतूने अनेक समाज सेवकांच्या अविरत संघर्षानंतर माहिती आधिकार अधिनियम हा कायदा अस्तित्वात आला आहे. मात्र गेल्या काही वर्षांत हा कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन व प्रशासन स्तरावर खुपच उदासीनता असल्याचे दिसून येत आहे.नागरीकांना हक्क व अधिकार देणारा हा कायदा शासनाला नकोच आहे. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परंतु हा कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरीकांनी यात सहभागी होणे व या कायद्याचा सामान्य नागरिकांपर्यंत प्रचार व प्रसार होणे ही काळाची गरज असुन जागरूक व प्रामाणिक नागरीकांचा मोठा दबावगट निर्माण झाला तरच माहिती आधिकार कायदा वाचणार आहे. हा कायदा वाचावा त्याचा तळागाळापर्यंत प्रचार व प्रसार व्हावा यासाठी माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशनचे अविरत प्रयत्न चालुच आहेत असे नमुद करत या अधिवेशनामध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील जागरूक नागरिकांनी व माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सामिल व्हावे असे आवाहन माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी केले आहे.

### उपोषणाची चेतावणी...

सोडणे किती गरजेचे आहे त्या दृष्टीने सूचना केल्या त्यामुळे शुक्रवारी पाटबंधारे विभागाच्या वतीने तलावात पाणी सोडण्यात आले. त्यामुळे लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष राज पाटील यांनी प्रकाश दादा सोळंके यांचे आभार मानले आहे. वडवणी तालुक्यातील कुंडलिका नदीवर असलेला अप्पर कुंडलिका प्रकल्प या वर्षी लवकरच भरलेला आहे. हे धरण ओसंडून वाहत असल्यामुळे या धरणाचे पाणी कालव्याद्वारे मामला चिंचोटी आणि तीगाव येथील तलावामध्ये सोडण्यात यावे अशी मागणी ॲड राज पाटील यांनी पाटबंधारे विभागाकडे अनेक वेळा केली होती. याबाबत पाणी सोडले नाही तर १७ सप्टेंबर पासून उपोषण करण्यात येईल असा इशारा देखील दिला होता. राज पाटील यांनी माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय नेते आ. प्रकाश दादा सोळंके साहेब यांच्या कडे देखील निवेदन देऊन याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली होती. आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी राज पाटील यांना पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार प्रकाशदादांनी प्रशासकीय पातळीवर दूरध्वनी करून आणि पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. त्यामुळे दिनांक १२ सप्टेंबर रोजी अप्पर कुंडलिका धरणाचे पाणी मामला आणि चिंचोटी धरणात सोडण्यात आले. तीगाव धरणात देखील पाणी सोडण्यात येणार आहे. राज पाटील यांनी ही मागणी लावून धरल्यामुळे आणि प्रकाश दादा सोळंके यांनी या मागणीचा पाठपुरावा केल्यामुळे प्रशासनाने हे पाणी सोडले आहे. त्यामुळे जनतेमधून एडवोकेट राज पाटील आणि विकासप्रिय नेतृत्व आमदार प्रकाश दादा सोळंके यांचे आभार मानले जात आहे. १७ सप्टेंबरचे उपोषण स्थगित होणार : मामला आणि चिंचोटी तलावात पाणी सोडण्यात येत आहे तीगाव तलावात देखील येत्या दोन दिवसात पाणी सोडण्यात येण्याची शक्यता आहे जर तीगाव तलावातही पाणी १७ सप्टेंबर च्या आत सोडण्यात आले तर राज पाटील उपोषण मागे घेणार आहेत.

### अपर जिल्हादंडाधिकारी...

प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

### अविस्मरणीय ऐतिहासिक....

तीर्थ ग्रामीण रुग्णालयाचे अधिष्ठता डॉक्टर शंकर धपाटे, डॉक्टर राकेश जाधव, डॉक्टर बिराजदार, डॉक्टर ज्ञानोबा दराडे,डॉक्टर शेळके, अविनाश मुडेगावकर दत्ता आंबेकर, परमेश्वर गीते, मोहम्मद फैजान, आरेफ सिद्दिकी, सय्यद नईम सर्व ज्युनियर सीनियर डॉक्टर व नर्सिंग स्टाफ स्वच्छता कर्मचारी हे उपस्थित होते. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय येथील नेत्र चिकित्सा विभागातील सर्व महिला डॉक्टर कडून त्या माता व मुलाची नवीन कपडे देऊन ओटी भरण्यात आली अशी घटना क्वचित घडते यावरून निदर्शनात आले नेत्र चिकित्सा विभागातील सर्व डॉक्टरांतर्फे हा ऐतिहासिक कार्यक्रम घेण्यात आला त्यावेळी डॉक्टर संकेत निसाले सहाय्यक प्राध्यापक, डॉक्टर नीलम कवडे, ज्ञानेश्वर पिंपरे, जयश्री तोंडे, जवेरीया शेख, समीक्षा पराते, सुरज अवघडे, निलेश जायभाय, संजना पास्टे कोमल तायडे, प्राची गिरवलकर, हर्षदा सूर्यवंशी, संतोष चांदणे, मृणाल जवंजाळ, नागनाथ यमगीर,मार्फत करण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमात चे सूत्रसंचालन डॉक्टर नीलम कवडे तर आभार प्रदर्शन डॉक्टर एकनाथ शेळके सरांनी मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वतीने बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत या विषयावर जनजागृती शिबीर संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल.यावलकर यांच्या मार्गदर्शनानुसार सरस्वती विद्यामंदिर बीड येथे 'बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत' याविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बीड येथील शिवाजीनगर भागातील सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर या प्रशालेत 'न्याय सर्वांसाठी' या संकल्पने अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड मार्फत 'बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत' याविषयी मार्गदर्शन आयोजित केले होते. अधिकार मित्र मिथुन जोगदंड यांनी बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा आणि नशामुक्त भारत या विषयी माहिती दिली व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण टोल फ्री क्रमांक १५१०० विषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन



केले. कोणत्या परिस्थितीमध्ये बालकांचा संरक्षण कायदा लागु होतो याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, जर कुणावर अन्याय होत असेल तर न घाबरता विद्यार्थ्यांनी समोर येवून तक्रार केली पाहिजे व अशा परिस्थितीमध्ये एकमेकांना सहकार्य केले पाहिजे असे विद्यार्थ्यांना सांगुन सजग केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अधिकार मित्र मिथुन जोगदंड यांनी पोक्सो कायद्यामधील गुन्हयांचे मुख्य पाच प्रकार सांगितले लैंगिक अत्याचार, लैंगिक छळ/स्पर्श, अश्लील प्रदर्शन, मानसिक छळ, ऑनलाईन शोषण जसे की उदाहरणार्थ लैंगिक छळ स्पर्श-मुलांना जबरदस्तीने चुकीच्या पध्दतीने स्पर्श करणे, अश्लील कृत्य करणे. मोबाईल मध्ये मुलांना अश्लील संदेश, व्हिडीओ पाठवणे, बालकांना लवकरात लवकर संरक्षण आणि न्याय मिळावा यासाठी खटले विशेष न्यायालयात चालवले जातात, जेणेकरून निकाल लवकर लागेल, असे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. शिवराज शिंदे (डऊळ लॉयर) यांनी विद्यार्थ्यांना बालक म्हणजे काय? बालकांचे वय किती मानले जाते. तसेच 'गुडटच बॅडटच' पोक्सो कायद्यानुसार बालकांवरील कोणत्याही प्रकारचा छळ हा गंभीर गुन्हा मानला जातो. त्यासाठी कठोर शिक्षा होऊ शकते. बालकांवर होणाऱ्या अत्याचारांविषयी गुप्तता राखुन तक्रार नोंदवली जाते. पिडीत बालक व त्याच्या कुटुंबाचे संरक्षण करण्यासाठी शासनाने विविध तरतुदी केल्या आहेत. त्यामुळे घाबरून न जाता पालक शिक्षक किंवा पोलिसांना त्वरीत माहिती देणे गरजेचे आहे. या बाबत विद्यार्थ्यांना जागृत करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात अधिकार मित्र मिथुन जोगदंड यांनी नालसाच्या डॉन स्कीम संवाद स्किम व जागृती स्किम या तीनही योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना सांगितली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत पवार ,सूत्रसंचालन ढोरमारे यांनी केले. आभार प्रदर्शन घोडके यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी तसेच लाखोळे , मेडकर, येडे, लांडगे, हे मान्यवर उपस्थित होते.

# नैसर्गिक शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर

**बीड । प्रतिनिधी**

ईट गावातील गुगळादेवी नैसर्गिक शेतकरी गट व समृद्धी महिला नैसर्गिक शेतकरी गट या दोन्ही गटाने एकत्रित येऊन पाणी फाउंडेशन च्या माध्यमातून करत असलेली शेती त्यामध्ये तंतोतंत ीचे पालन करून करत असलेली शेती आणि त्याला जोड म्हणजे विद्यापीठे त्यातीलच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी या विद्यापीठाच्या माध्यमातून आमच्या गुगळादेवी गटाला बैलचलित अवजार बँक देण्यात आली त्यामध्ये पारंपरिक शेतीमध्ये जी हाताने कामे करायचो तेच कामे आता बैलानेच



करायचे पण सुधारित यंत्राने होणार आहेत त्यामध्ये बीबीएफ पेरणी असेल तीन कोळपेचा सट एकाच शेतकऱ्यांनी कोळपायचे असतील त्यामध्ये माणूस बाळाची बचत होणार आहे कापूस पेरणी यंत्र सरी काढणी यंत्र औत मल्चिंग पेपर हातरणीयंत्र छोटे कोळपे छोटा सौरवरचे फवारा आणि बैलगाडी मध्ये बारा नवजली बैलगाडी फवारा त्यामध्ये शेतकऱ्याची अशी बचत होणारे की वेळही वाचणार आहे आणि कमी कालावधीमध्ये जास्त फवारणी होणार आहे महिलांसाठी शेवयाची मशीन चटणी कांडण यंत्र या सर्व अवजारांचा गुगळादेवी नैसर्गिक शेतकरी गट वापर करणार आहे या तंत्राचा वापर करून शेतकरी समृद्धीकडे वाटचाल करत आहे कारण नैसर्गिक शेतीमध्ये ज्या निविष्ठा आपण घरीच बनवतो त्या निविष्ठा फवारण्यासाठी प्रात्यक्षिक बैलगाडी वरचे फवारणी यंत्रचे डोईफोडे यांच्या शेतावर डेमो करण्यात आले आपल्याला खामगाव किवीच्या माध्यमातून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील अवजार बँक देण्यात आले आज आपल्या ईट येथे आपल्या परिसराचे भूषण असलेले गोरक्षनाथ टेकडीचे महंत श्री ह भ प शांतिब्रह्म नवनाथ बाबा गोरक्षनाथ टेकडीकर हे पण कार्यक्रमाला उपस्थित होते.

# मराठा आंदोलनावेळी मृत पावलेल्या बांधवाच्या कुटुंबीयांना मंत्री प्रताप सरनाईक यांच्या स्व:खर्चातून प्रत्येकी ५ लाखांची मदत

## संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते कुटुंबीयांना मदत देण्याची घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या आंदोलनासाठी मुंबईकडे प्रयाण करताना तसेच तेथे पोहोचल्यानंतर काही आंदोलक बांधवांचे दुर्दैवी निधन झाले. या हृदयद्रावक घटनेमुळे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या गोरगरीब कुटुंबियांच्या डोळ्यात आशेचा किरण निर्माण व्हावा आणि त्यांना न्याय व आधार मिळावा यासाठी परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी पुढाकार घेत स्वखर्चातून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. तरी ही मदत संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते संबंधित कुटुंबियांना देण्यात येणार आहे.



मराठा आंदोलनात दुर्दैवी मृत्यु पावलेले आंदोलक १) सतीश देशमुख - गाव: वरपगाव, ता. केज, जि. बीड २) विजय चंद्रकांत घोगरे - गाव: टाकळगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर ३) अतुल कवचट - गाव: केसापुरी, ता. बीड, जि. बीड ४) गोपीनाथ जाधव - गाव: बोराळा, ता. वसमत, जि. हिंगोली ५) भारत यादव खरसाडे - गाव: आहेर वडगाव, ता. बीड, जि. बीड हा निर्णय समाजासाठी संवेदनशीलता व बांधिलकीचे प्रतीक ठरत असून, मृतांच्या कुटुंबीयांना दिलासा देणारा ठरणार आहे. ही मदत लवकरच संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात येणार आहे.

# मराठा मावळा संघटनेची बीड जिल्हा बैठक संपन्न

## बीड कृषी उत्पन्न बाजार समितीला दिले शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृह बांधण्याचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

दि. ११/०९/२०२५ वार गुरुवार रोजी मराठा मावळा संघटनेची बीड जिल्ह्यातील पदाधिकारी व मावळ्यांची बैठक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. माणिकराव शिंदे पाटील यांनी घेतली यावेळी बैठकीस प्रा. माणिकराव शिंदे पाटील, प्रदेश सचिव प्रा. सुभाष जाधव, मराठवाडा अध्यक्ष श्री. नंदकिशोर



साळुंके पाटील यांनी संघटनेच्या वाटचाली बाबत व ध्येयधोरणा बाबत मार्गदर्शन केले व त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड येथील सचिव यांना शेतकऱ्यांच्या मुलांसाठी २००० क्षमतेचे वसतिगृह बांधवे याबाबत निवेदन देऊन वसतिगृहाची उभारणी करण्याबाबत उपाययोजना नाही झाली तर आंदोलनात्मक पवित्रा घेतला जाईल याबद्दल अवगत केले.

संघटनेच्या बीड जिल्हा बैठकीस व निवेदन देण्यासाठी प्रदेश संघटक श्री. भरत कदम पाटील, छ. संभाजीनगर जिल्हाध्यक्ष श्री. संजय गायके पाटील, बीड जिल्हाध्यक्ष श्री. प्रदीप माने पाटील, बिडचे वकील सेलचे जिल्हाध्यक्ष रवीं. योगेश टेकाळे पाटील, गणेश शेळके पाटील, अमित जाधव पाटील, रामदास हांडगे पाटील, गेवराई तालुकाध्यक्ष भागवत डाके पाटील, रेणापूर ता. युवक अध्यक्ष प्रितम क्षीरसागर, वडवणी तालुकाध्यक्ष अशोक कदम, लक्ष्मण शिंदे पाटील,अतुल घरत पाटील, सौरभ आवारे पाटील आदी पदाधिकारी मावळे यावेळी उपस्थित होते.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) दिव्यांग आघाडीच्या माजलगाव तालुक्यातील पदाधिकारी निवडी जाहीर



**बीड । प्रतिनिधी**

खा.रामदास आठवले केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार तथा राष्ट्रीय अध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ ) यांच्या आदेशानुसार व युवक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष पप्पू कागदे तसेच सुरेश माने दिव्यांग आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली दिव्यांगआघाडी माजलगाव च्या पदाधिकारी यांच्या निवडी शाहु डोळस जिल्हा अध्यक्ष दिव्यांगआघाडी जिल्हा बीड यांनी नेते पप्पू कागदे यांच्या हस्ते पदाधिकारी यांचा नियुक्ती पत्र देऊन सत्कार ज्ञर करण्यात आले.या प्रसंगी माजलगाव तालुका उपाध्यक्ष पदी दिगांबर लोखंडे, तसेच सचिवपदी सिद्धेश्वर खंडागळे, सह सचिव रामेश्वर वाव्हलकर, कोषाध्यक्ष रामेश्वर तांबे,व सह कोषाध्यक्ष महादेव ढगे यांना निवडीचे पत्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या मध्यवर्ती कार्यालय बशीर गंज बीड येथे देण्यात आले.

# हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे पाटोदा गु.र.नं २५४/२०२५ कलम १३७ (२) बी.एन.एस. अन्वये दिनाक १२/०८/२०२५ रोजी गुन्हा दाखल झाला असुन त्यामध्ये पिडीत मुलीचा शोध लागत नसुन मुलगी रूपाली सचिन शेलार वय १६ वर्षे २ महिने ९ दिवस रा. दासखेड ता. पाटोदा, जि.बीड ही दिनांक ११/०८/२०२५ रोजी रात्री घरात शोध घेतला असता मिळून आली नाही. वगैरे मजकूरा वरून दि. १२/०८/२०२५ रोजी पोलीस ठाणे पाटोदा जि.बीड येथे गुन्हा दाखल आहे तरी सदर मुलीचा आज पावेतो शोध लागला नाही. सदर मुलीचे वर्णन खालील प्रमाणे. नाव- रूपाली सचिन शेलार वय १६ वर्षे २ महिने ९ दिवस रा. दासखेड ता. पाटोदा, जि.बीड मुलगी आढळून आल्यास (०२४४) २४२५३३, संपर्क साधावा.


## जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**
Under the Consumer Protection Act, 2019
MISCELLANEOUS APPLICATION NO. DC/470/MA/3/2023

Petitioner / Appellant - Kailash So. Ramrao Sharnagat
Versus
Opposite Party / Respondent Name: - Bharat alies Vijay Mariba Alzende Chairman Parivartan Urban Multi State Co-Operative Credit Society Ltd.

To. Opposite Party / Respondent(s)
1. BHARAT ALIES VIJAY MARIBA ALZENDE CHAIRMAN PARIVARTAN URBAN MULTI STATE CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LTD. R/O. PANCHSIL NAGAR, NEAR SATHE CHOWK, MAJALGAON, TQ.MAJALGAON BEED MAHARASHTRA
2. SANJAY S/O.BABULALJI SHARAM SANCHLAK, PARIVARTAN URBAN MULTI STATE CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LTD. R/O.KALIKA NAGAR,MAJALGAON,TQ.MAJALGAON BEED MAHARASHTRA
3. ARJUN S/O.MANOHAR HOKE, SANCHLAK, PARIVARTAN URBAN MULTI STATE CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LTD. R/O. ZENDA CHOWK,MAJALGAON,TQ.MAJALGAON BEED MAHARASHTRA

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक सरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २३/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक ०९/०९/२०२५
ठिकाण - बीड
शिक्का
(स्वाक्षरीत)
प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.

## जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**
Under the Consumer Protection Act, 2019
CONSUMER CANE NO, DC/470/CC/488/2024

Petitioner / Appellant - SHAHARDA W/O LAXMAN SALUNKE
Versus
Opposite Party / Respondent Name: - DNYANRADHA MULTISTATE COOP CREDIT SOCIETY LID

To. Opposite Party / Respondent(s)
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. RO. HEAD BRANCH- DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, TQ. BEED. BEEDMAHARASHTRA.
2. SURESH S/O. DNYANOBA KUTE, PRESIDENT, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. R/O. NEAR CHAMADA FACTORY, M.I.D.C., BEED, TQ. BEED. BEED MAHARASHTRA
3. YASHVANT S/O. VASANTRAO KULKARNI, VICE-CHAIRMAN, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. R/O. HEAD BRANCH- DNYANRADHA BHAVAN, BEHIND HONDA SHOWROOM, JALNA ROAD, BEED, TQ. BEED. BEED MAHARASHTRA
4. BRANCH MANAGER, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BRANCH SARDA SANKUL,BEED, TQ. BEED. BEED MAHARASHTRA

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक सरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०६/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत.जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक - ०९/०९/२०२५
ठिकाण - बीड
शिक्का
(स्वाक्षरीत)
प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.

## जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**
Under the Consumer Protection Act, 2019
CONSUMER CASE NO. DC/470/CC/487/2024

Petitioner / Appellant - MEERA W/O. MAHADEO RAUT
Versus
Opposite Party / Respondent Name: - SHREE SAIRAM URBAN MULTISTATE CO.OP.CREDIT SOCIETY LTD. BEED.

To. Opposite Party / Respondent(s)
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. RO. HEAD BRANCH- DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, TQ. BEED. BEEDMAHARASHTRA.
2. SURESH S/O. DNYANOBA KUTE, PRESIDENT, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. R/O. NEAR CHAMADA FACTORY, M.I.D.C., BEED, TQ. BEED. BEED MAHARASHTRA
3. YASHVANT S/O. VASANTRAO KULKARNI, VICE-CHAIRMAN, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. R/O. HEAD BRANCH- DNYANRADHA BHAVAN, BEHIND HONDA SHOWROOM, JALNA ROAD, BEED, TQ. BEED. BEED MAHARASHTRA
4. BRANCH MANAGER, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BRANCH SARDA SANKUL,BEED, TQ. BEED. BEED MAHARASHTRA

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक सरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०६/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक ०९/०९/२०२५
ठिकाण - बीड
शिक्का
(स्वाक्षरीत)
प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.

## रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड

### अंतिम जाहीर सुचना

दिनांक : ०८/०९/२०२५

संस्थेचे थकित सभासद व त्यांचे जामीनदार यांना अंतिमतः या जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, आपण पुढील उल्लेखित कर्जदार व सहकर्जदार यांना अनेक वेळी महाराष्ट्र सहकारी संस्था अधि.१९६० चे कलम १०१(१) अन्वये लेखी सूचना/सुनावणी नोटीस व सुनावणी नोटीस क्र.२ पाठविलेल्या असतांनाही आपण त्यास कसलिही दाद दिली नाही. मे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. वडवणी यांनी दि.२४/०६/२०२५, २२/०७/२०२५ रोजी खालील नमूद कर्जदार यांना सुनावणीची संधी दिली असतांनाही आपण सुनावणीस गैरहजर राहतील अथवा आपण लेखी म्हणने सादर केले नाही. अथवा रक्कम भरणा केली नाही त्यामुळे या नैसर्गिक न्याय तत्वाने पुन्हा एक अंतिमतः संधी देण्यात येत आहे. कर्जदार व जामीनदार तथा सहकर्जदार यांनी कार्यालयीन वेळेत मंगळवार दि.२३/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. वडवणी येथे कार्यालयात उपस्थित राहून आपली बाजू आपण स्वतः अथवा आपले प्रतिनीधी मार्फत मांडावी तथा आपले लेखी स्वरुपात सादर करावे तथा संपूर्ण कर्ज बाकी भरणा करावी. नसता नाईलाजास्तव आपणाविरुध्द एकतर्फा आदेश प्रमाणपत्रासह निर्गमीत करुन पूढील कार्यवाही करणेत येईल व यासाठी होणाऱ्या परीणामास व खर्चास आपण स्वतः जबाबदार रहाल याची विशेष नोंद घ्यावी.

| अ.क्र. | अर्ज क्र. | कर्जदार/जामीनदारांची नांवे | पत्ता | दावा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | | श्री. टकले सिताराम वैजिनाथ - कर्जदार | मु.पो. सुदर्शन नगर वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ४,८७,३४२/- |
| ०२ | | श्री. शिंदे अमर राधाकिसन - कर्जदार | मु.पो. अमरदीप मोबाईल शॉपी शिवाजी चौक वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ७,७०,३२७/- |
| ०३ | | श्री. गायकवाड झुंबर जनार्दन - कर्जदार | मु.पो. सुंदरनगर, तेलगांव, ता. धारुर, जि. बीड | ३,४०,६५२/- |
| ०४ | | श्री. मुंडे आसाराम शेषेराव - कर्जदार<br>श्री. बडे गहिनीनाथ रामलिंग - जामीनदार | मु.पो. बंगला चौक वडवणी, ता. वडवणी, जि. बीड<br>मु.पो. चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड | ७,३७,३३१/- |
| ०५ | | श्री. मिसाळ पंकज पांडुरंग - कर्जदार | मु.पो. इंद्रप्रस्थनगर, बीड,जि. बीड | ७,४१,३०९/- |
| ०६ | | श्री. वीर पांडुरंग आसाराम - कर्जदार | मु.सुर्डी (थोट),पो. ताडसौंदणा, ता. जि. बीड | ५,५८,३३४/- |
| ०७ | | श्री. नागवे रामेश्वर काशीनाथ - कर्जदार | मु.पो. बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड | ८,६०,७८३/- |
| ०८ | | श्री. कसबे संजय नाथ्याबा - कर्जदार | मु. पो. गोपाळनगर, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ३,८९,३०८/- |
| ०९ | | श्री. चव्हाण गोरख लहू - कर्जदार | मु. पो. सोन्ना खोटा, ता.वडवणी,जि. बीड | १,५७,७४६/- |
| १० | | श्री. मायकर ज्ञानेश्वर नवनाथ - कर्जदार | मु. लोंढेवाडी, पो. सोन्नाखोटा, ता. वडवणी, जि. बीड | १,५९,५००/- |
| ११ | | श्री. मुंडे रमेश बाबासाहेब - कर्जदार | मु.पो. चिंचवण रोड वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ७९,७३७/- |
| १२ | | श्री. राठोड बाळू सुखदेव - कर्जदार | मु. तिगांव, पो. चिंचाळा, ता. वडवणी, जि. बीड | १,०७,०५८/- |
| १३ | | श्री. सय्यद दौलत मीर - कर्जदार | मु. पो. मुस्लिम मोहल्ला वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ६,०३,३९३/- |
| १४ | | श्री. गोंडे ज्ञानेश्वर जनार्दन - कर्जदार | मु. पो. चिंचोटी वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ३,९५,६३२/- |
| १५ | | श्री. मुंडे बालाजी बाबासाहेब - कर्जदार | मु. पो. चिंचवण रोड, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ७२,७९९/- |
| १६ | | श्री. बडे अर्जुन शिवाजी - कर्जदार | मु. पो. चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड | ६६,७६१/- |
| १७ | | श्री. खळगे दिपक कृष्णा - कर्जदार | मु. मामला, पो. पिंपरखेड, ता. वडवणी, जि. बीड | ६७,१७४/- |
| १८ | | श्री. जाधव शंकर बाबुराव - कर्जदार | मु. पो. कुप्पा, ता. वडवणी, जि. बीड | ७३,९८५/- |
| १९ | | श्री. आडे संतोष बळीराम - कर्जदार | मु. चौफळदरा तांडा, पो. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ६६,६८६/- |
| २० | | श्री. नाडे शिवाजी पांडुरंग - कर्जदार | मु. पो. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ३८,७५३/- |
| २१ | | श्री. शेंडगे बाळनाथ नामदेव - कर्जदार | मु. पो. मोरवड, ता. वडवणी, जि. बीड | ७१,७९८/- |
| २२ | | श्री. तोंडे नारायण शामराव - कर्जदार | सध्या रा.मु. पो. सोनिमोहा, ता. धारुर, जि. बीड | ३७,१०३/- |
| २३ | | श्री. शेख रेहाना बबर - कर्जदार | मु. पो. चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड | ३,६९,७२१/- |
| २४ | | श्री. गार्डी सिध्देश्वर रामभाऊ - कर्जदार | मु. पो. पावरलूम वस्ती वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ७,९२,६०८/- |
| २५ | | राठोड मुक्ताजी नवनाथ- कर्जदार | मु. पो. तिगांव तांडा, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | १,९६,४५९/- |
| २६ | | श्री. बापमारे गोपाळ बाबासाहेब- कर्जदार | मु. पो. खळवट लिमगांव, ता. वडवणी, जि. बीड | ५,२१,०७१/- |
| २७ | | श्री. उजगरे राम किशोर- कर्जदार | मु. पो. भिमनगर वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | २,२३,०६५/- |
| २८ | | श्री. मुंडे सतिष रावसाहेब- कर्जदार | मु. पो. ग्रामीण पोलीस स्टेशन बीड, ता. जि. बीड | ५,६९,१८४/- |
| २९ | | श्री. गळांगे गणेश सदाशिव- कर्जदार | मु. पो. काळा हनुमान जवळ वडवणी, ता. वडवणी, जि. बीड | ३,७३,९०४/- |
| ३० | | श्री. मात्रे बाबासाहेब प्रभु- कर्जदार | मु. पो. चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड | ५,७९,२०५/- |

मार्फत सल्लागार

(स्वाक्षरीत)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, ता. वडवणी

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ ● पान ४



*बीड यश मेन्सवेअर ला संपादक दत्तात्रय नरनाळे यांनी भेट दिली असता सत्कार करताना श्री. गणेश नरनाळे यांनी अनेक संकटाना तोंड देत झिरो तुन हे सर्व विश्व निरमण केले त्यांना देखील या प्रसंगी शुभेच्छा देण्यात आल्या. छायाचित्रात दिसत आहेत.*

# खा.सोनवणेंची कार्यतत्परता; बीडमध्ये उपोषणकर्त्यांशी संवाद साधत जाग्यावर काढला मार्ग

## गटसचिवांचा प्रश्न मार्गी, वंजारा समाजाच्या मागणीला पाठिंबा अन् गायरानधारकांना दिला दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी खा.बजरंग सोनवणे धावून येत असल्याचे वारंवार पहायला मिळत आहे.दि.१२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसलेल्या उपोषणकर्त्यांची खा.सोनवणे यांनी तत्परतेने भेट घेत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्थेतील गटसचिवांचा प्रश्न मार्गी लावून तातडीने उपोषण सोडविले. याच बरोबर बंजारा समाजाच्या मागणीला जाहिर पाठींबाही दिला. दरम्यान, गायरान धारकांना तुमचा प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना बोलतो, असे म्हणत दिलासा दिला.



मागील काही दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी उपोषणे सुरू आहेत. दि.१२ सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करत असलेल्या उपोषणकर्त्यांची भेट घेतली. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्था, म.बीड येथे ८६ कर्मचारी कार्यरत असून मागील ४ ते ५ वर्षांपासून त्यांचे वेतन करण्यात आलेले नाही. असे असले तरी ते कामकाज पुर्ण करत आहेत. असे असताना त्यांना वेतन दिले जात नाही. सदरील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात यावे, यासाठी दि.८ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू आहे. खा.सोनवणे यांनी भेट दिल्यानंतर जिल्हा उपनिबंधक यांनी उपोषणस्थळी येऊन पुढील २० दिवसात वेतनाचा प्रश्न मार्गी लावला जाईल, असे लेखी दिले. ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### सुजाता शिनगारे यांना समाजशास्त्र विषयात पीएचडी



**धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील आरणवाडी येथील सुजाता राम शिनगारे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने समाजशास्त्र विषयात पीएचडी जाहीर केली आहे. ज्येष्ठ सामाजिक अभ्यासक डॉ. स्मिता अवचार यांच्या मार्गदर्शनात 'वृद्ध महिलांच्या आरोग्याच्या समस्या : विशेष संदर्भ औरंगाबाद शहर' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. त्यास विद्यापीठाने मान्यता दिली आहे. डॉ. सुजाता शिनगारे यांनी एम.ए. समाजशास्त्रातही विद्यापीठातून प्रथम क्रमांक मिळवला होता. त्याशिवाय एम.फिल.चे संशोधनही पूर्ण केलेले आहे. या यशाबद्दल धारुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील शिनगारे, संचालक शिवाजी मायकर, न्यूरोलॉजिस्ट डॉ. विलास शिनगारे, डॉ.रामहारी मायकर, ड. सार्थक माने, आरणवाडीचे सरपंच भागवत शिनगारे, सदाशिव शिनगारे, सतीश शिनगारे यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

### इद ए मिलाद उन् नबी निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

#### रिपब्लिकन सेना युवा तालुकाध्यक्ष सय्यद



#### अन्वर यांचा स्तुत्य उपक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

इद ए मिलाद उन् नबीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पात्रुड येथे गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. रिपब्लिकन सेनेचे युवा तालुकाध्यक्ष सय्यद अन्वर रफियोद्दीन यांनी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य प्रदान करून एक सामाजिक बांधिलकी जपणारा स्तुत्य उपक्रम राबविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत पात्रुडच्या सरपंच नौशाद लतीफ मोमीन यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन सेना बीड जिल्हाध्यक्ष विजयदादा साळवे, ग्राम विकास अधिकारी भागवत भुजबळ उपस्थित होते. याशिवाय विशेष उपस्थितीत शेख युसूफ (अध्यक्ष, नवनियुक्त तंटामुक्त समिती), बाळासाहेब बनकर (ग्रामपंचायत सदस्य), मोइज चौधरी (ग्रामपंचायत सदस्य), सय्यद नाजेर भाई, शेख रफीक हाफेजसाब, समियोद्दीन अन्सारी (व्यवस्थापन समिती अध्यक्ष), मोनीन अन्सारी यांसह पत्रकार प्रकाश यादव, शेख राजु, सय्यद जकिर, पठान निसार, जिलानी कुरेशी आदी मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम शिक्षणाची गोडी वाढविण्यासोबतच गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला. समाजाच्या विकासासाठी व शिक्षण प्रसारासाठी रिपब्लिकन सेना युवा तालुकाध्यक्ष सय्यद अन्वर यांचे योगदान प्रेरणादायी आहे.

### सामुहिक विवाह सोहळयात विवाह करणाऱ्या दाम्पत्यांना कन्यादान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सामुहिक विवाह सोहळयास प्रोत्साहन मिळावे या हेतूने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००३-०४ या आर्थिक वर्षापासून कन्यादान योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयामार्फत करण्यात येते. सदर योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत आयोजित केलेल्या सामुहिक विवाह सोहळयात भाग घेवून विवाह केलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दाम्पत्यांस प्रतिदाम्पत्य रु. २०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते तसेच असा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस प्रतिदाम्पत्य रुपये ४.०००/- इतके अनुदान देण्यात येते. सामुहिक विवाह सोहळयात किमान १० दाम्पत्यांचे विवाह होणे अपेक्षित आहे. व्यक्तीगत पातळीवर केल्या जाणाऱ्या विवाह सोहळयामध्ये अनाठायी खर्च होवू नये व सामुहिक विवाह सोहळयास प्रोत्साहन मिळावे यासाठी स्वयंसेवी संस्थाना असे सामुहिक विवाह सोहळे आयोजित करण्याचे तसेच अनूसूचित जाती व नवबौध्द घटकातील व्यक्तीना अशा विवाह सोहळयात विवाह करण्याचे आवाहन समाजकल्याणचे सहायक आयुक्त यांनी केले आहे. सदर बाबतीत अधिक माहितीसाठी, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड या कार्यालयास संपर्क साधावा.

# घरफोडी प्रकरणातील आरोपी अटक : बीड शहर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलिसांनी पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी करत घरफोडी व दागिने चोरी प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे. घटना अशी होती की, बीड शहर मधील पिंगळे गल्लीतील रहिवासी धनराज गुरखुदे हे त्यांच्या पत्नीच्या उपचारासाठी कुटुंबासह छ.संभाजीनगर येथे गेले होते. त्या काळात घराला कुलूप लावून ते बाहेर गेले असताना, अज्ञात चोरट्याने घराची कडी-



कोंडा तोडून आत प्रवेश केला व घरातील सोने-चांदीसह मौल्यवान वस्तू चोरी केल्या. ही गंभीर घटना घडल्यानंतर पोलीस ठाणे बीड शहर येथे फिर्यादी मार्फत गुन्हा दाखल झाल्यावर पोलिस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी तात्काळ तपास गतीमान करण्याच्या सूचना बीड शहर पोलिसांना दिल्या. तपासादरम्यान तांत्रीक माहिती आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयित हा स्थानिक रहिवाशी शिवा ▶ उर्वरित पान २ वर

## वाढदिवसानिमित्त रुई गावाचे उपसरपंच खरवडे यांचा हवेत गोळीबार

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये मागील काही दिवसांमध्ये हातात शस्त्र बंदूक घेऊन फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड पोलिसांना सूचना करून हातात शस्त्र घेऊन फोटो व व्हिडिओ व्हायरल करणारा वर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तरीही काही राजकीय नेत्यांना कायद्याचा धाक उरला नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. गेवराई तालुक्यातील रुई गावाचे उपसरपंच सचिन खरवडे यांनी त्यांच्याच वाढदिवसाच्या



कार्यक्रमात एअर गनमधून हवेत गोळीबार करून उपस्थितांना थक्क केले. गावातच झालेल्या या ▶ उर्वरित पान २ वर

## पाटोद्यात रस्त्यांची दयनीय अवस्था पाच वर्षे पूर्ण होण्याआधीच विकासाचा बुरखा फाटला!

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोद्यात रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली असून, लाखो रुपयांचा निधी खर्च करून करण्यात आलेले रस्ते पाच वर्षे पूर्ण होण्याआधीच उध्वस्त होत आहेत. काही भागात धुळीचे साम्राज्य तर काही भागात खड्ड्यांचे जाळे दिसून येत असल्याने सर्वसामान्य नागरिकांचा संताप उसळला आहे. सत्ताधारी व प्रशासनाने गुणवत्तापूर्ण विकासकामे केल्याचे कितीही दावे केले तरी प्रत्यक्षात परिस्थिती याउलट आहे. रस्त्यांच्या नावाखाली केवळ जनतेच्या पैशांची लूट झाली असून, पाटोद्यातील रस्त्यांची अवस्था पाहता हे सर्व चित्र स्पष्ट होत आहे. एवढ्या कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून असे निकृष्ट दर्जाचे रस्ते का झाले ? काम सुरु करताना अधिकारी, अभियंते, जनप्रतिनिधी यांनी दर्जा का पाहिला नाही ?पाच वर्षे टिकाव धरू न शकणारे रस्ते म्हणजे भ्रष्टाचाराचे थेट उदाहरण नाही का ? पावसाळ्यात खड्ड्यांनी रस्त्यांचा चक्काचूर केला आहे. अनेक ठिकाणी रस्ते ओळखूही येत नाहीत. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांचे हाल तर होत आसून यावरून दिसते जनतेच्या पैशावर सरळसरळ डल्ला मारण्यात आला आहे.पाटोद्यातील रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत नागरिक आता सोशल मिडियावरही संताप व्यक्त करत आहेत. यामुळे जबाबदार कंत्राटदारांवर व त्यांना काम मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी,अशी मागणी जनतेतून जोर ▶ उर्वरित पान २ वर

## माहिती अधिकार महासंघाचे १४ सप्टेंबर रोजी सोलापूर येथे अधिवेशन ; सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र भावे यांच्या हस्ते उद्घाटन ; मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (फेडरेशन) ही महाराष्ट्रातील ही जागरूक नागरीकांची व माहिती अधिकार कार्यकर्त्यांची सर्वात मोठी संघटना असुन महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजतापासुन ते सायंकाळी ४ पर्यंत शिव छत्रपती रंगभवन ,शांतीसागर महाराज चौक ,सोलापुर येथे आयोजित केले आहे.या अधिवेशनासाठी राज्याच्या ३५ जिल्ह्यातुन सुमारे



पाचशेच्या वर कार्यकर्ते उपस्थित राहतील असा विश्वास माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी व्यक्त केला आहे. या अधिवेशनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकारी कार्यकर्ता महासंघ चे डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.

या अधिवेशनाचे उद्घाटन नाशिक येथील सुप्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते आणि निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या हस्ते १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार असुन कार्यकर्त्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. हे अधिवेशन यशस्वी व्हावे यासाठी माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ ▶ उर्वरित पान २ वर

# उपोषणाची चेतावणी अन् तलावात आलं पाणी मदार प्रकाश सोळंके यांचा पाठपुरावा आला कामी

## अँड. राज पाटील यांनी उपोषणाचा इशारा देताच सोन्नाखोटा प्रकल्पाचे पाणी मामला चिंचोटी तलावात

**वडवणी । प्रतिनिधी**

तुडुंब भरून वाहत असलेल्या सोन्नाखोटा येथील अप्पर कुंडलिकाचे पाणी मामला चिंचोटी तीगाव या छोट्या छोट्या तलावांना कालव्याद्वारे सोडावे अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष राज पाटील यांनी प्रशासनाकडे केली होती. पाणी सोडले नाही तर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनापासून उपोषण करण्यात



येईल असा इशारा राज पाटील यांनी दिला होता. माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय नेते आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब यांनी प्रशासनाला या तलावात पाणी ▶ उर्वरित पान २ वर

### पाणी सोडण्याचे पूर्ण श्रेय आमदार दादांना

**ॲड. राज पाटील यांनी अप्पर कुंडलिकाचे पाणी तीगाव चिंचोटी मामला तलावात सोडण्यासाठी निवेदन देऊन उपोषणाचा इशारा दिला होता. शुक्रवारी पाणी सोडण्यात आल्यानंतर प्रतिक्रिया देताना ॲड. राज पाटील यांनी सांगितले की हे पाणी सोडण्याचे पूर्ण श्रेय माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय नेते आमदार प्रकाश दादा सोळंके यांना देत आहे. कारण प्रकाश दादांकडे मी मागणी केल्यानंतर त्यांनी तत्काळ प्रशासनाला दुरध्वनी वरुन सूचना दिल्या होत्या एवढेच नाही तर त्यांनी लेखी पत्र व्यवहार देखील पाणी सोडण्यासंदर्भात केला होता. त्यामुळे हे पाणी सोडण्याचे पूर्ण श्रेय मी आमचे लोकप्रिय नेते आ. प्रकाश दादा सोळंके यांना देत आहे.**

## अपर जिल्हादंडाधिकारी यांचे प्रतिबंधात्मक आदेश जारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. २२ सप्टेंबर पासून नवरात्र उत्सव सुरु होत असून दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा होणार आहे. तसेच मराठवाडा मुक्ती संग्राम दिवशी राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या ▶ उर्वरित पान २ वर

# अविस्मरणीय ऐतिहासिक क्षण, मुलाच्या जन्मानंतर दीड महिन्याने आईने पहिल्यांदा मुलाला पाहिले

### ● भावनिक क्षणाचे साक्षीदार, डॉक्टर, पत्रकार, कर्मचारी व रुग्ण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय कोणत्या ना कोणत्या घटनेच्या बातम्या सतत वृत्तपत्रात येत असतात. पण आजची बातमी ही विशेष ऐतिहासिक आहे. जन्म लेल्या पोटच्या गोळ्याला पाहण्यासाठी महिलेला दीड महिन्याचा कालावधी लागला. कळम तालुक्यातील भोई समाजाची एक महिला त्या महिलेला दिवस



गेल्यापासून काही दिवसानंतर अंधुक दिसू लागले चार ते पाच महिन्यानंतर पूर्ण दृष्टी त्या महिलेची गेली त्यातच त्या महिलेला एक गोंडस मुलाला जन्म दिला पण दृष्टी नसल्याकारणाने दीड महिन्यापासून त्या मातेला आपल्या पोटच्या मुलाला प्रत्यक्षात बघता आलं नाही. ही बाब स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयातील नेत्र चिकित्सा शास्त्र विभागातील तज्ज्ञडॉक्टरांना कळाले त्यांनी त्या महिलेचे प्राथमिक तपासणी करून मागच्या दहा दिवसा ऑपरेशन करण्यास ठरवले हे ऑपरेशन अत्याधुनिक पद्धतीने करण्यात आले. त्या संदर्भातील संपूर्ण माहिती डॉक्टर ज्ञानोबा दराडे यांनी दिली. महिलेच्या दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू पिकलेल्या अवस्थेत काचबिंदू होण्याची शक्यता असताना देखील ऑपरेशन करून त्या महिलेला दृष्टी मिळवून दिली. आज तो क्षण आला स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाचे अधिष्ठता डॉक्टर शंकर धपाटे यांच्या हस्ते त्या महिलेची डोळ्यावरची पट्टी काढण्यात आली व पहिल्यांदा आपल्या पोटच्या गोळ्याला पाहताना त्या भावना शब्दात मांडू शकत नाहीत. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी स्वामी रामानंद ▶ उर्वरित पान २ वर